आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ एप्रिल २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- पतधोरण आढावा समितीच्या बैठकीनंतर व्याजदर सव्वा ५ टक्क्यांवर ठेवण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय, युद्धाच्या परिणामांबाबत सावध पवित्रा

- इराणबरोबरच्या दोन आठवड्यांच्या सशर्त युद्धविरामाची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

- युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात तेजी, कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण

- कोल्हापुरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते समरजितसिंह घाटगे यांचा भाजपात प्रवेश

**आणि**

- काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसिना किडवाई यांचं निधन

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं व्याजदर जैसे-थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पतधोरण आढावा समितीच्या ३ दिवसीय बैठकीत झालेले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज जाहीर केले. त्यानुसार रेपो दर सव्वा ५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय पतधोरण आढावा समितीनं एकमतानं घेतल्याचं त्यांनी सांगितलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून.

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवर तर चालू आर्थिक वर्षात हा दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के राहील, अशी शक्यता रिझर्व्ह बँकेनं व्यक्त केली आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर ४ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असाही रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. पश्चिम आशियातल्या युद्धामुळे वाढलेल्या इंधनाच्या किंमती, एल निनोमुळे देशातल्या पावसावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता यामुळं महागाईचा दर वाढू शकतो, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.*

*पश्चिम आशियातल्या संघर्षामुळं देशाच्या आर्थिक वृद्धीदरावर विपरीत परिणाम होईल, असं मत गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी मांडलं आहे. या संघर्षावर wait and watch अशी भूमिका घेतानाच तिकडच्या परिस्थिती बाबत सजग राहून संभाव्य आव्हानांवर लक्ष ठेवण्याचा निर्णय रिझर्व्ह बँकेनं घेतल्याचं*

*गव्हर्नर म्हणाले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असून पूर्वी पेक्षा परिस्थिती अधिक चांगली असल्याचंही त्यांनी नमूद केलं. युद्धाच्या काळात सरकारनं केलेल्या विविध  उपाययोजनांमुळं युद्धाचा परिणाम कमी व्हायला मदत झाल्याचंही ते म्हणाले.*

*आधीच्या आर्थिक वर्षांच्या तुलनेत गेल्या आर्थिक वर्षात रुपयाचं अवमूल्यन अधिक झाल्याचं त्यांनी आज सांगितलं. परकीय चलन बाजारपेठेत अतिरीक्त हस्तक्षेप न करण्याची रिझर्व्ह बँकेची भूमिका कायम असून रुपयाच्या विनिमय दरासाठी कुठलीही पातळी ठरवली नसल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.)*

**<><><><><>**

इराणबरोबरच्या दोन आठवड्यांच्या सशर्त युद्धविरामाची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. होर्मुझच्या सामुद्रधनीतून सागरी वाहतुकीला परवानगी देण्याची अट ट्रम्प यांनी घातली आहे. मात्र, या युद्धविरामावर द्विपक्षीय सहमती असायला हवी, असं ट्रम्प यांनी समाज माध्यमावर म्हटलं. हा संघर्ष आता थांबवण्याच्या जवळ येऊन पोहोचल्याचे संकेतही ट्रम्प यांनी दिले. दुसरीकडे इराणवरचे हल्ले थांबवल्यास इराण युद्धविरामासाठी सहमती देईल, असं इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी म्हटलं आहे. दोन आठवड्यांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाणार असल्याचंही ते म्हणाले.

इराणबरोबरच्या दोन आठवड्यांचा युद्धविरामाला इस्त्रायलनेही पाठिंबा दिला आहे. मात्र, हिजबोल्ला संघटनेबरोबरच्या संघर्षामुळे लेबनॉनबरोबर मात्र युद्धविराम करता येणार नसल्याचंही इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी स्पष्ट केलं आहे.  संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनीही या युद्धविरामाचं स्वागत केलं असून पश्चिम आशियातल्या संघर्षात सहभागी झालेल्या प्रत्येक देशाने युद्धविरामाच्या अटींचं पालन करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

इराणबरोबरच्या युद्धविरामाच्या घोषणेनंतर भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये २ हजार ८०० पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही ८००पेक्षा जास्त अंकांची वाढ झाली. दरम्यान, युद्धविरामानंतर जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत मात्र मोठी घसरण झाली. ब्रेंट क्रूड तेल १३ पूर्णांक ३ दशांश

टक्क्यांनी घसरून ९४ डॉलर ७७ सेंट प्रतिबॅरल इतकं झालं आहे. तर अमेरिकेत निर्यात होणारं तेल ९१ डॉलर ११ सेंट प्रतिबॅरल इतकं झालं आहे.

**<><><><>**

सर्व भारतीयांनी लवकरात लवकर इराण सोडावा असा सल्ला परराष्ट्र मंत्रालयानं दिला आहे. भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहून आणि त्यांनी सांगितलेल्या मार्गांचा वापर करूनच बाहेर पडावं, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे. दूतावासाशी चर्चा केल्याशिवाय कोणत्याही आंतरराष्ट्रीय भू-सीमेकडे जाण्याचा प्रयत्न करू नका, असंही मंत्रालयानं जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सांगितलं आहे. मदतीसाठी भारतीय दूतावासानं दिलेले मोबाईल नंबर असे -
**९८९१२८१०९११५**, **९८९१२८१०९१०९**, **९८९१२८१०९१०२** आणि **९८९९३२१७९३५९**.
तसंच **cons.tehran@mea.gov.in** या ईमेलवरही संपर्क साधता येईल.

**<><><><>**

कोल्हापूर जिल्ह्यात कागलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि शाहू उद्योग समूहाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, त्यांचे पुत्र अखिलेश सिंह, विरेंद्रसिंह घाटगे, पंचायत समितीच्या सभापती सुवर्णा पाटील, उपनगराध्यक्ष जयंत रावण यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार धनंजय महाडिक, ज्येष्ठ नेते प्रकाश आवाडे आदी उपस्थित होते.

**<><><><>**

नाशिक शहरामध्ये वृक्षतोड करण्यास राष्ट्रीय हरित लवादाने महापालिकेला 28 एप्रिलपर्यंत मनाई केली आहे. पर्यावरणप्रेमी मनीष बाविस्कर यांनी या संदर्भात याचिका दाखल केली होती. त्यावरच्या सुनावणीदरम्यान लवादाने हे आदेश दिले.

नाशिकमध्ये गेल्या तीन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असून त्याला पर्यावरणप्रेमींनी विरोध केला आहे.

**<><><><>**

भोंदू बाबा अशोक खरातला आणखी एका बलात्कार प्रकरणात १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी नाशिक जिल्हा न्यायालयाने दिली आहे. २०२० पासून धार्मिक विधींच्या नावाखाली आपलं वेळोवेळी लैंगिक शोषण त्याने केल्याचा आरोप तक्रारदार महिलेनं केला आहे. खरात विरुद्धच्या आरोपांची चैकशी करणाऱ्या विशेष तपास पथकानं आज त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केलं. तेव्हा मुख्य न्यायदंडाधिकारी बी एन इचपुरानी यांनी हा आदेश दिला. खरातला आता नाशिकरोड इथल्या मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात येईल.

**<><><><>**

लातूर बाजारात कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे कांद्याचे दर चार ते सहा रुपये प्रति किलोपर्यंत कमी झाले आहेत. यंदाच्या हंगामातला हा सर्वात नीचांकी दर असल्याचं मत व्यापारी आणि शेतकऱ्यांनी व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

लातूर जिल्ह्याच्या जळकोट तालुक्यातील एकुर्का खुर्दे इथल्या एका ४७ वर्षीय शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात एका पोलिस कर्मचाऱ्यासह सहा जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><>**

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी केंद्रीय मंत्री मोहसीना किडवई यांचं आज नोएडा इथल्या रुगणालयात निधन झालं. त्या ९४ वर्षांच्या होत्या. उत्तर प्रदेशातल्या मेरठ मतदारसंघाचं प्रतिनिधित्व त्यांनी सलग ३ वेळा केलं. २००४ ते

२०१६ या काळात त्या छत्तीसगढ मधून राज्यसभेवर निवडून गेल्या होत्या. केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांनी ग्रामविकास, आरोग्य आणि कुटुंबकल्याण, परिवहन, नगरविकास अशा विविध खात्यांचं मंत्रिपद सांभाळलं. काँग्रेसच्या अखिल भारतीय कार्यकारिणीच्या त्या सदस्य होत्या.

**<><><><><>**

आयएसएसएफ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेच्या १० मीटर मिश्र प्रकारात भारताच्या पलक आणि मुकेश नेलावल्ली या भारतीय नेमबाजांनी सुवर्णपदकाची कमाई करत नवा विश्वविक्रमही प्रस्थापित केला. त्यांनी ४८७ पूर्णांक ७ शतांश गुण मिळवत ही कामगिरी गेली. स्पेनच्या ग्रानडा इथं काल झालेल्या अंतिम फेरीत त्यांनी चीनच्या प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकलं.

**//<><><><><>//**